नमस्कार मी अजित भुरे. अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या ह्या शंभराव्या नाट्यसंमेलन प्रसंगी सर्व नियामक मंडळाच्या वतीने मी आपले स्वागत करत आहे.

दिनांक १६ मे २०२३ रोजी निवडणूक झाली आणि नवीन नियामक मंडळ अस्तित्वात आलं. रसिकांचे लाडके विक्रमादित्य प्रशांत दामले हे अध्यक्ष झाल्यानंतर आम्हा सर्वांसमोर पहिलं लक्ष्य होतं बंद पडलेलं यशवंत नाट्यसंकुल सुरू करण्याचं. रंगमंचावर उपस्थित असलेले आमचे तहहयात विश्वस्त मा. शरद पवार ह्यांच्या आशीर्वादामुळं आणि मा. शशी प्रभू ह्यांच्या सक्रीय सहभागामुळे तसंच मा. उदय सामंत, मोहन जोशी, अशोक हांडे, गिरीश गांधी ह्यांच्या पाठिंब्यामुळे आम्ही केवळ २५ दिवसात नाट्यगृहाची आवश्यक ती दुरुस्ती सर्व परवानग्यांसह पूर्ण करू शकलो. १४ जून २०२३ रोजी गोविंद बल्लाळ देवल स्मृतिदिनी दिमाखात सुरू झालेलं संकुल गेले काही महिने नाटकातील कलाकारांच्या आणि रसिकांच्या गर्दीत फुलून आलेलं आहे ह्याचा आम्हाला सविनय अभिमान आहे.

त्यानंतर लगेच जबाबदारी होती ती ह्या शंभराव्या नाट्य संमेलनाची. हे एक प्रकारचं शिवधनुष्य आहे हे आपण सर्व जाणताच. शंभरावं संमेलन अविस्मरणीय असायला हवं ह्या दृष्टीने आखणी करायची होती.

आजच्या ह्या मुख्य संमेलनापूर्वी दिनांक २७ डिसेंबर २०२३ रोजी ९९ व्या संमेलनाचे अध्यक्ष मा. प्रेमानंद गज्वी आणि आमचे काही सदस्य खास तंजावर येथे जाऊन आले. तंजावर येथील शाहाराज राजे भोसले ह्यांनी १६९० साली मराठी नाटक लिहिल्याची नोंद सापडते. त्यांना मानवंदना देण्यासाठी प्रा गज्वी स्वतः तंजावर येथे गेले आणि तिथे एका छोट्या कार्यक्रमाचं आयोजन आमच्या सदस्यांनी केलं.

त्यानंतर २९ डिसेंबर २०२३ रोजी नाट्यपंढरी म्हणून गणल्या जाणाऱ्या सांगलीत ह्या शंभराव्या संमेलनाची मुहूर्तमेढ रोवली गेली. संपूर्ण महाराष्ट्रात आता विविध ठिकाणी विभागीय संमेलनं होणार आहेत आणि सर्वच शाखा सध्या उत्साहाने काम करत आहेत.

विविध शाखांना कामकाजात स्वातंत्र्य देणं, त्यांनी स्वबळावर उपक्रम आयोजित करत स्वतःला सक्षम करणं असं अध्यक्ष प्रशांत दामले आणि आमच्या कार्यकारिणीचं मत आहे.

अशा शाखांपैकी एक म्हणजे पुणे.

पहिलं समेलन झालं होतं त्या पुण्यात ह्या विभागीय नाट्यसंमेलनांचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत काल संपन्न झाला.

आणि त्याच जिल्ह्यातील एक शाखा म्हणजे पिंपरी चिंचवड. ह्या शाखेच्या पुढाकाराने आज मध्यवर्ती नाट्यपरिषदेचं हे संमेलन इथे होत आहे.

नाट्य परिषदेचं निश्चित ध्येय काय आणि कामांची दिशा कशी असावी ह्याचा विचार ह्या संमेलनात व्हायला हवा. ह्या संमेलनाचे नियोजित अध्यक्ष माननीय जब्बार पटेल आणि आमच्या संस्थेचे तहहयात विश्वस्त मा. शरद पवार ह्यांच्या मार्गदर्शनानुसार आम्ही सर्वच काम करायला तत्पर आहोत. आज ह्या संमेलनाच्या निमित्ताने एक नाट्यकलावंत आणि नाट्य परिषदेचा प्रमुख कार्यवाह ह्या दोन्ही भूमिकांमधून एक मनोगत आपल्या परवानगीने सादर करत आहे.

नाट्यगृहांचा प्रश्न हल्ली सातत्याने मांडला जातो. नाट्यगृह बांधतानाच काही गोष्टींचा विचार परिषद आणि शासनकर्त्यांनी करायला हवा. केवळ एक देखणं चकचकीत सभागृह म्हणजे नाट्यगृह नव्हे. प्रेक्षक आणि कलाकार ह्यांचा जो आपापला अवकाश असतो, आपापली जी “स्पेस” असते , त्या दोन्हींचा समन्वय साधण्याचा प्रयत्न नाट्यगृह

रचनाकारांनी करायला हवा. तसं झालं तरच रसिक आणि कलाकार ह्यांत एक बंध निर्माण होतो आणि नाट्यकृती रंगते. नाट्यगृह बांधण्यापूर्वीच त्यांची देखभाल कशी करता येईल ह्याची आखणी केली, त्या संदर्भातील आर्थिक बाबींचं नियोजन केलं तर नाट्यगृहांचं भविष्य चांगलं असेल असं माझ्या अनेक रंगकर्मी मित्रांना वाटतं .

केवळ मराठी रंगभूमीपुरतं सीमित न राहाता विविध भाषांतील ,प्रांतांतील अगदी विविध देशांतील नाटकं कशी आहेत ह्याचा शोध नाट्यपरिषदेने घेऊन त्याची ओळख आपल्या कलाकारांना करून दिली पाहिजे. ह्यामुळे सर्वांचाच दृष्टिकोन बदलेल आणि मराठी रंगभूमी जास्त समृद्ध होऊ शकेल.

प्ले इज दि थिंग असं म्हटलं जाणाऱ्या ह्या दुनियेत लेखकाचं स्थान सर्वोच्च असायला हवं. उत्तमोत्तम लेखक घडवणं हे आपलं आद्य कर्तव्य असायला हवं. जर उत्तम संहिता नसेल तर उत्तम प्रयोग कसा उभा राहाणार? त्या अनुषंगाने लेखकांची फळी निर्माण करण्यासाठी आपण विविध योजना कशा राबवू शकतो ह्याकडे परिषदेने लक्ष द्यायला हवं.

परिषदेचं काम आणि एकूणच मराठी नाटक ह्याकडे युवक कसा आकर्षित होईल ह्याकडे लक्ष द्यायला हवं. जर तरुणाई आपल्याबरोबर असेल तर उत्साह आणि नावीन्य ह्यांची सांगड घालता येईल जी भविष्यातील रंगभूमीसाठी पोषक ठरेल.

नाटकासाठी प्रशिक्षण ही अत्यंत महत्वाची गोष्ट नाट्यपरिषद अंमलात आणू शकते. प्रशिक्षणाचा कालावधी, अभ्यासक्रमाचं स्वरूप, तज्ज्ञ आणि अनुभवी व्यक्तींचा सहभाग, प्रशिक्षणार्थींसाठी रेपरटरी सारखा पर्याय उपलब्ध करून देणं ह्या आणि अशा इतर गोष्टींना प्राधान्य देणं हे नाट्यपरिषदेचं कर्तव्य असेल.

रंगमंच कामगार हा मराठी नाटकातील एक महत्वाचा घटक. कमीत कमी मोबदल्यात जास्तीत जास्त मेहनत घेणाऱ्या ह्या मित्रांसाठी भविष्य निर्वाह निधी उभारण्यासारखी एक योजना हाती घेणं हे सुद्धा नाट्यपरिषदेचं एक उद्दिष्ट असायला हवं.

आमचे ज्येष्ठ मित्र नाना पाटेकर अशा गोष्टींबाबत नेहमीच पुढाकार घेत असतात. कुठलाही कलाकार आजारी असेल तर ते स्वतःहून फोन करून चौकशी करतात आणि जमेल तितकी मदत देऊ करतात. आपल्या स्वकीयांचं आपण काही देणं लागतो ही भावना त्यांच्यासारख्या व्यक्तींकडून शिकणं आणि नाट्य परिषदेच्या कार्यात ती प्रत्यक्षात आणणं हे आपल्यातल्या प्रत्येक सदस्याचं स्वप्न असायला हवं .

नाट्यसृष्टीतील निर्मात्यांपुढे फार गंभीर समस्या आहेत. वाढता निर्मिती खर्च, प्रयोग खर्चाची ओढाताण, कलाकारांची जुळवाजुळव, रोडावणारी प्रेक्षकसंख्या ह्यात आर्थिक गणित बऱ्याच वेळा कोलमडून जातं. खर्च कमी कसा करता येईल ह्याबरोबरच आमदनी कशी वाढवता येईल ह्या दिशेने विचार करताना नवनवीन माध्यमं, आर्थिक शिस्त, पारदर्शकता इत्यादि बाबींकडे नवीन दृष्टिकोनात पाहात प्रत्यक्ष कार्यवाही करण्याकडे भर द्यावा लागेल.

वरील सर्व मुद्यांवर साकल्याने विचार करून आमच्या कालावधीत जमेल तितकं काम करता येण्याकडे आमचा कल असेल ह्याची ग्वाही ह्याप्रसंगी देतो.

नाट्यपरिषद आणि त्या संस्थेची निवडणूक ही गेली काही वर्ष गाजणारी बातमी असते. तशा बातम्यांपेक्षा आपल्या नाट्यविषयक कार्याची बातमी होणं हे कलाकार म्हणून आपलं प्रथम कर्तव्य असायला हवं. निवडणुकांसाठी राजकारण हे क्षेत्र आहे आणि ते आपलं क्षेत्र नसेल तर आपण त्यात न पडलेलं बरं अशी जास्तीत जास्त कलाकारांची, सदस्यांची भावना आहे आणि असायला हवी. आपल्यात वैचारिक मतभिन्नता असली, विसंवाद असले तरी कलेसाठी

पोषक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून आपण आपल्यात मैत्रीपूर्ण संवाद कसा साधू शकतो ह्याकडे आपण लक्ष द्यायला हवं.

रंगमंचावर आज अनेक राजकीय व्यक्ती उपस्थित आहेत. ह्या संमेलनाचे मुख्य निमंत्रक मा. उदय सामंत हे उद्योगमंत्री आहेत. नाट्यव्यवसायाला उद्योगाचं रूप कसं देता येईल ह्यासाठी ते सतत कार्यरत असतात. . सांस्कृतिक कार्यमंत्री श्री मुनगंटीवार ह्यांच्या रुपाने आम्हाला एक नाट्यप्रिय रसिक लाभला आहे जो संपूर्ण कलाक्षेत्रातील कलाकारांना उत्तेजन देत असतो. उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार ह्यांनी अर्थमंत्री ह्या भूमिकेत जास्तीत जास्त निधी ह्या संमेलनाासाठी उपलब्ध करून दिला आहे. आजचे उद्‌घाटक मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नेहमीच मराठी नाटक प्रगतीपथावर राहावं ह्यासाठी मदत करायला उत्सुक असतात. मराठी कलाकार ह्याबाबतीत सुदैवी आहेत. रसिकमान्यतेइतकंच राजमान्यता मिळण्याचं सुख मराठी कलाकारांच्या वाट्याला आलं आहे. ह्या वर्षीचं हे शंभरावं नाट्यसंमेलन यशस्वी करण्यात ह्या सर्वांचंच महत्वपूर्ण योगदान आहे हे नमूद करून आणि त्यांच्यासह आपल्या सर्वांचे, माझ्या सर्व कलाकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, रंगमंच कामगार ह्यांचे , माझ्या कार्यकारी समिती तसंच नियामक मंडळ सदस्य मित्रांचे आणि पत्रकारांचे आभार मानून हे मनोगत संपवतो.

धन्यवाद.